नि.फौ.ख.क्र. ७७/२०१८
निशाणी ६१

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ६ यांची जबानी**

मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव– संतोष नामदेव मातोंडकर
वय – ५२ वर्षे, व्यवसाय – मोलमजूरी
रा.आरवली, सोन्सुरे, ता. वेंगुर्ला, जि. सिंधुदुर्ग.

**सरतपास सहायक सरकारी वकील श्रीमती. व्ही.व्ही.ठाकूर यांच्यामार्फत सुरु–**

मी माझ्या कुटुंबात पत्नी व दोन मुलांसह राहतो. आरवली येथे देव वेतोबा यांचे मंदिर आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी श्रीदेव वेतोबा मंदिराजवळ पे ॲण्ड युज टॉयलेट शासन निधी मधून बांधले होते. सदर पे ॲण्ड युज टॉयलेटचे बांधकाम सन २०१४ च्या आधी झाले होते. सन २०१४ साली सदरची इमारत ही देवाच्या कामासाठी तोडण्याचे ठरले. त्यानंतर सदरची इमारत जे.सी.बी.च्या सहाय्याने गावातील काही लोकांनी थोडीशी तोडली. त्यावेळी रेगे वगैरे होते. मी बांधकाम तोडताना प्रत्यक्ष पाहिले होते. ज्या लोकांनी बांधकाम तोडले त्यांची नावे मला सांगता येणार नाही. ज्या माणसांनी बांधकाम तोडले ती माणसे न्यायालयात हजर आहेत किंवा कसे हे मी सांगू शकत नाही.

**सदर साक्षीदार सरकारी पक्षास सहाय्य करीत नसलेने त्यास सरकारी वकीलांनी उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली ती त्यांना देण्यात आली.**

०२. (साक्षीदाराला त्याच्या जबाबातील अधोरेखांकित भाग 'अ' वाचून दाखविला.) तो मी पोलीसांना सांगितला नव्हता. पोलीसांनी सदरचा मजकूर त्यांच्या जबाबामध्ये का लिहिला आहे याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की आरोपींना वाचविण्यासाठी मी आजरोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पूर्ण.**

**<u>उलटतपास आरोपींतर्फे वकील श्री.एस.एन.भणगे यांनी नाकारला –</u>**

श्रवणोत्तर स्विकृत,

सही/–

दिनांक– १२/१२/२०२४

(डी.वाय.रायरीकर)
न्यायदंडाधिकारी वर्ग १, वेंगुर्ला.